**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**



**अंक ७६/२०२०** **दिनांक २२/०९/२०२०** **कालावधी ५ दिवस**



| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०९/२०२० ते २२/०९/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०९/२०२० सकाळी ८:३० पासून २७/०९/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१६/०९** | **१७/०९** | **१८/०९** | **१९/०९** | **२०/०९** | **२१/०९** | **२२/०९** | | **२३/०९** | **२४/०९** | **२५/०९** | **२६/०९** | **२७/०९** |
| ०.० | - | ४.४ | ०.० | ०.० | - | - | **पाऊस (मिमी)** | ७७ | १०० | २७ | २० | ३ |
| ३०.६ | - | - | ३०.० | ३०.८ | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३१ | ३२ | ३३ | ३३३ |
| २५.० | - | २४.० | २४.२ | २५.० | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २४ | २५ | २५ | २५ |
| ३ | - | ६ | ५ | ४ | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८७- | - | ९० | ९२ | ८९ | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९४ | ९६ | ९५ | ९२ | ९२ |
| ८५ | - | - | ८६ | ८६ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७७ | ८५ | ८३ | ८० | ७२ |
| ०.० | - | १.९ | ०.० | ०.० | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ८ | ७ | ८ | ७ |
| शांत | - | प. | शांत | शांत | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | द. | द. | द. | द. |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यात दिनांक २३ ते २७ सप्टेंबर, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे. |
| **इशारा** | दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी ठाणे जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता असून दिनांक २३ सप्टेंबर, २०२० रोजी जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे. |

| **पिक** | **अवस्था** | **हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पोटरी ते फुलोरा अवस्था (गरव्या जाती), फुलोरा ते दाणे भरणे अवस्था (निमगरव्या जाती) आणि दाणे भरणे ते परिपक्वता अवस्था (हळव्या जाती)** | • दिनांक २३ आणि २४ सप्टेंबर २०२० रोजी जोरदार पाऊसाचा अंदाज असल्याने भात खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी आणि दिनांक २५ सप्टेंबर २०२० नंतर गरवे आणि निम गरवे भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हळवे भात परिपक्व अवस्थेत असल्यास कापणीपूर्वी ८ ते १० दिवस खाचरातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• दिनांक २३ आणि २४ सप्टेंबर २०२० रोजी जोरदार पाऊसाचा अंदाज असल्याने गरवे आणि निमगरवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असताना देण्यात येणारी नत्र खताची तिसरी मात्रा १७ किलो युरिया प्रती एकरी पुढे ढकलावी आणि त्यानंतर पाऊसाची उघडीप असताना देण्यात यावी.<br>• दिनांक २४ सप्टेंबर २०२० नंतर पाऊसाची उघडझाप राहण्याची शक्यता असून आर्द्रतेत वाढ संभवत असल्याने दुधाळ अवस्थेत असलेल्या निमगरव्या भात पिकावर लोंबीवरील ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. भात पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रौढ ढेकण्या व त्याची लहान पिल्ले दाण्याला छिद्र पाडून आतील रस शोषून घेतात. त्यामुळे दाणे पोचट राहतात आणि लोंब्या अर्धवट भरतात. अशा दाण्यावर एक सूक्ष्म छिद्र दिसून येते व छिद्राभोवती काळपट, तपकिरी ठिपका तयार होतो. किडीच्या नियंत्रणासाठी बांधावरील गवत कापून बांध स्वच्छ ठेवावेत. पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रति चूड एक ढेकण्या आढळून आल्यास नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे किंवा १.५ टक्के क्लोरपायरीफॉस भुकटी ८ किलो प्रति एकरी सायंकाळी किंवा सकाळी लवकर वारा शांत असताना आणि पाऊसाची उघडीप असताना धुरळावी (टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.)<br>• ढगाळ वातावरण आणि अधूनमधून पडणाऱ्या पाउसामुळे गरवे आणि निमगरवे भात पिकावर बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून दिनांक २३ आणि २४ सप्टेंबर २०२० रोजी जोरदार पाऊसाचा अंदाज असल्याने दिनांक २४ सप्टेंबर २०२० नंतर पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • दिनांक २३ आणि २४ सप्टेंबर २०२० रोजी जोरदार पाऊसाचा अंदाज असल्याने नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **चिकू** | **फळधारणा** | • दिनांक २३ आणि २४ सप्टेंबर २०२० रोजी जोरदार पाऊसाचा अंदाज असल्याने चिकू बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |

| | | |
|---|---|---|
| **भाजीपाला रोपवाटिका** | **रोपवाटिका** | • दिनांक २३ आणि २४ सप्टेंबर २०२० रोजी जोरदार पाऊसाचा अंदाज असल्याने पेरणी केलेल्या भाजीपाला रोपवाटिका क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |